ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8 ]
Total No. of Printed Pages : 8 ]
ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 48 ]
Total No. of Questions : 48 ]

**C**

**CCE PF**
**CCE PR**
**REVISED**

Question Paper Serial No. **80**

येथून कापा.

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 85-M**

**Code No. : 85-M**

# ವಿಷಯ : ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ

# Subject : SOCIAL SCIENCE

**( ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ / Marathi Version )**

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ/ New Syllabus )**

**( ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ & ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Fresh & Private Repeater )**

ದಿನಾಂಕ : 09. 04. 2020 ] [ Date : 09. 04. 2020
ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 9-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 12-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 9-30 A.M. to 12-45 P.M.
ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 ] [ Max. Marks : 100

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
**प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.**

**विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 48 प्रश्न आहेत.
2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.
3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नांसाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

Tear here

I. **खालील प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यापैकी एक पर्याय बरोबर आहे. बरोबर असलेला पर्याय निवडून त्याच्या इंग्रजी मुळाक्षरासह पूर्ण उत्तर दिलेल्या उत्तर पत्रिकेमध्ये लिहा :** 8 × 1 = 8

1. 1453 साली कॉन्स्टॅन्टिनोपल शहर यानी काबीज केले

   (A) अरबानी (B) ऑटोमन तुर्कानी

   (C) इटलियानी (D) पोर्तूगीजानी.

2. छोड़ो भारत चळवळीने काँग्रेस व्यतिरिक्त नेत्याना नायकत्व दिले. खालील पैकी काँग्रेस व्यतिरिक्त नेता ओळखा.

   (A) कस्तूरबा गाँधी (B) डॉ० बी० आर० आंबेडकर

   (C) जयप्रकाश नारायण (D) मौलाना अबूल कलाम आझाद.

3. चीनचे पंतप्रधान चाऊ-एन-लाय यांच्या बरोबर पंचशील तत्वावर सही केलेले भारताचे पंतप्रधान

   (A) जवाहरलाल नेहरू (B) लाल बहादूर शास्त्री

   (C) इंदिरा गांधी (D) अटल बिहारी वाजपेयी.

4. बालिकांच्या सबलिकरणासाठी ''बालिका संघाची'' स्थापना आणि त्याचे निर्वाहन यांच्या कडून केले जाते.

   (A) बालहक्क रक्षण समिती (B) बाल ग्रामसभा

   (C) बाल सुरक्षा समिती (D) अंगणवाडी.

5. कारगील जवळील 'द्रास' येथे सर्वात कमी तापमानाची नोंद आहे. कारण हे

   (A) सुर्याची किरणे लंबरूप पडत असलेल्या प्रदेशात असल्याने

   (B) समुद्राजवळ असल्याने

   (C) अती उंच प्रदेशात असल्याने

   (D) नैऋत्भ मान्सून वाऱ्याच्या प्रभावात असल्याने.

6. आमच्या संविधानाचे ( घटना ) कलम 21 हे सांगते.

(A) अनुसुचीत जाती / जमाती यांच्यात शैक्षणिक आवड निर्माण करण्यासाठी पाटिंबा देणे हे सरकारचे कर्तव्य आहे.

(B) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था स्थापन करण्यास संधी देणे

(C) सामाजिक न्याय आणि लोकांच्या कल्याणासाठी संधी देणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे

(D) शिक्षण हा मुलांचा मूलभूत हक्क आहे.

7. सरकार खालिलपैकी यामधून करेतर महसूल जमा करते.

(A) वस्तू आणि सेवा कर ( GST ) (B) विविध प्रकारचा दंड

(C) आयात-निर्यात कर (D) स्टँप ड्यूटी.

8. "धवल क्रांतीचे जनक" म्हणून प्रसिद्ध असलेले उद्योजक हे आहेत.

(A) डॉ० प्रताप रेड्डी (B) नरेश गोयल

(C) वर्गिस कुरियन (D) किरण मजुमदार शहा.

II. **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :** 8 × 1 = 8

9. बंगालमध्ये 'दुहेरी राज्यव्यवस्था' कोणी लागू केली ?

10. राजा राममोहन रॉय याना सतीपद्धत विरुद्ध संघर्ष करण्यास गव्हर्नर जनरल विल्यम बेंटिक याने कसे सहकार्य केले ?

11. मानवी हक्क दिवस केंव्हा साजरा केला जातो ?

12. स्त्री-भ्रूण हत्या म्हणजे काय ?

13. उष्ण कटिबंधातील पानझडी अरण्याना 'मान्सून अरण्ये' असे ही म्हणतात. का ?

14. लोकसंख्येची घनता म्हणजे काय ?

15. वस्तू विनिमय पद्धत म्हणजे काय ?

16. ग्राहक चळवळीच्या इतिहासात 15 मार्च, 1962 हा दिवस का महत्वाचा समजला जातो ?

III. **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी चार मुद्यात लिहा :** 18 × 2 = 36

17. भारतातील राज्यांना स्वतःच्या नियंत्रणाखाली आणण्यासाठी सहाय्यक सैन्य पद्धतीचा ब्रिटिशाना कसा उपयोग झाला ?

18. 1961 साली गोवा पोर्तूगीजांपासून कसा मुक्त झाला ?

19. भारताच्या परराष्ट्र धोरणाची ध्येय काय आहेत ?

**किंवा**

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा समितीच्या कार्यांचे वर्णन करा.

20. सामाजिक स्तर हा वेगवेगळ्या प्रकारात कसा आहे ?

**किंवा**

1970 मध्ये डी० देवराज अरस यानी कर्नाटकात कशा प्रकार सामाजिक सुधारणा केल्या ?

21. पूर्व घाट आणि पश्चिम घाट यामधील फरक स्पष्ट करा.

22. मातीची धूप होण्याची कारणे कोणती ?

23. "स्वसहाय्य संघामुळे महिलांची सामाजिक प्रतिष्ठा आणि स्वायत्तता वाढते." कशी ?

24. जागतिकीकरण ग्राहकाला फायद्याचे आहे. स्पष्टीकरण द्या.

25. बक्सारच्या लढाईचे परिणाम सांगा.

26. दत्तक वारस नामंजूर या धोरणा अंतर्गत खालसा केलेल्या संस्थानांची नावे सांगा.

27. जूनागड भारतीय संघराज्यात कसे सामील झाले ?

28. "मानवी हक्काच्या संरक्षणासाठी भारत नेहमी सकारात्मकपणे समर्थन करित आहे." या वाक्याचे समर्थन करा.

29. संयुक्त राष्ट्र संघटनेची ( UNO ) ध्येय ( उद्दिष्ट्ये ) कोणती ?

30. मुलाच्या अपहरणाचे दुष्परिणाम कोणते ?

31. भारताच्या शेजारील राष्ट्राशी सीमा कशा आहेत ?

32. विद्युतशक्तीची उणीव भरुन काढण्यासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल ?

33. सार्वजनिक खर्चाचे प्रमुख उद्देश कोणते ?

34. ग्राहक संरक्षण कायद्याचे प्रमुख उद्देश कोणते ?

IV. **खालील प्रश्नांची प्रत्येकी सहा वाक्यात उत्तरे लिहा :** 9 × 3 = 27

35. "ब्रिटिश शिक्षणाच्या प्रभावाने नविन विचार आणि बोध निर्माण झालेली नविन भारतीय पिढी तयार झाली." कशी ?

36. हलगलीच्या बेरडांच्या बंडाचे वर्णन करा.

**किंवा**

आर्य समाजाच्या उद्देशांचे वर्णन करा.

37. "दुसरे महायुद्ध हे अत्यंत विध्वंसक युद्ध होते." कसे ?

38. भारताची आंतरिक समस्या जातीयवादाचे निर्मूलन करण्यासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवू शकाल ?

39. संघटित क्षेत्रातील आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांमधील फरक स्पष्ट करा.

40. वाहतूक आणि दळणवळणाचे महत्व काय आहे ?

**किंवा**

उद्योगधंद्याच्या स्थायीकरणावर परिणाम करणारे घटक सांगा.

41. भूकंपाच्या सावधगिरी उपायांची यादी तयार करा.

42. भारतातील पंचायत राज व्यवस्थेची प्रमुख लक्षणे कोणती ?

**किंवा**

भारतीय रिझर्व बँकेची कार्ये कोणती ?

43. पोस्टखात्याकडून ( टपाल कचेरी ) पुरविण्याऱ्या आर्थिक सेवा सांगा.

**किंवा**

उद्योजकांच्या प्रमुख कार्यांची यादी तयार करा.

V. **खालील प्रश्नाची प्रत्येकी आठ वाक्यात उत्तर लिहा :** 4 × 4 = 16

44. 1857 च्या भारतीय स्वातंत्र्याच्या पहिल्या युद्धाच्या अपयशाच्या कारणांचे वर्णन करा.

45. डॉ० बी० आर० आंबेडकर यांचे सामाजिक समानते विषयी असलेले योगदान स्पष्ट करा.

**किंवा**

जहाल मतवादीनी भारतीय स्वातंत्र्याची चळवळ अधिक तिव्रतेने पूढे कशी आणली ?

46. सिंधू संस्कृतीपासून आत्तापर्यंतचे भारत आणि चीन यांच्या नातेसंबंधांचे वर्णन करा.

47. आमच्या देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये शेतीचे महत्व काय ?

VI. 48. **भारताच्या नकाशाचा आराखडा काढा आणि त्यामध्ये खालील ठिकाणे दाखवा :** 1 + 4 = 5

a) 23 $\frac{1°}{2}$ उत्तर अक्षांश

b) गोविंद सागर

c) बाँबे हाय

d) तुतीकोरिन.

**अंध विद्यार्थ्यांकरिता पर्यायी प्रश्न : ( प्रश्न संख्या 48 च्या ऐवजी )**

नदी खोऱ्यातील बहुउद्देशोय योजनेचे प्रमुख उद्देश कोणते ? 5